मुंबई  मुद्रांक अधिनियम १९५८
महाराष्ट्र अधिनियम क्र. नऊ/ १९९०
अन्वये केलेल्या सुधारणाप्रमाणे जास्त धरलेल्या
मुद्रांक शुल्काचा परतावा मंजूर करण्याची
कार्यपध्दती..

# महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. मुद्रांक-१०९०/प्र.क्र. ३४५/म-१**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : २७ सप्टेंबर १९९०**

**प रि प त्र क :-**

शासन परिपत्रक, समक्रमांक दिनांक २६/६/१९९० अन्वये, जास्त भरलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा मंजूर करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही प्रकरणात मुद्रांक शुल्काचा परतावा मंजूर करताना पक्षकारांचे मुळ दस्त छायाचित्र नोंदणी कार्यालयाकडे छायाचित्रणासाठी पाठविण्यात आलेले आहे. त्यामुळे, पक्षकारांना त्यांच्या प्रकरणात परतावा मिळण्यास, अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्याकरिता अशा सूचना देण्यात येत आहेत की, ज्या प्रकरणी परतावा मंजूर करावयाचा आहे, परंतु पक्षकारांचे मुळ दस्त छायाचित्रणासाठी छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत. असे दस्त संबंधित दुय्यम निबंधकांनी तत्काळ त्या कार्यालयाकडून परत मागवून परताव्याची प्रकरणे विनाविलंब निकाली काढावी. अशा प्रकरणी परतावा मंजूर केल्यानंतर सदरचे मुळ दस्त पुन्हा नेहमीप्रमाणे शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक पुणे यांनी परतावा संबंधीचे मुळ दस्त छायाचित्र नोंदणी कार्यालयाकडे प्राप्त झाले असल्यास व त्यांची दुय्यम निबंधकांनी मागणी केल्यास, तात्काळ परत करण्याविषयी व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे यांना सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

सही/-

(के.के.विरशीद)

सहाय्यक सचिव

महसूल व वन विभाग

प्रति,

१) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई/ठाणे/पुणे/औरंगाबाद /नाशिक/ नागपूर

३) सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निबंधक

४) सर्व सह. जिल्हानिबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,

५) मुद्रांक अधिक्षक मुंबई.

६) दुय्यम निबंधक मुंबई

७) महालेखापाल, मुंबई/नागपूर

८) संचालक लेखा व कोषागारे मुंबई

९) अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/निवासी लेखा अधिकारी, मुंबई

१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/उपकोषागार अधिकारी

११) वित्त विभाग, व्यय-१०/कोष-४, मंत्रालय, मुंबई.

१२) निवड नस्ती मं-१, कार्यालय, महसूल व वन विभाग.